सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे- ४११ ००१

दूरध्वनी क्रमांक : २६१२२८४६ / ४७ Email – commcoop2011@gmail.com,

जा.क्र.४-सआ/का.व वैधा.कार्य./क.१०२ /अव.पॅनल/२०२२-२५/३४०/२०२१ दि. :-२५/११/२०२१

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, (सर्व)

विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये
अवसायक नियुक्तीसाठी अवसायकांचे पॅनेलबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे जा.क्र.८-सआ/वैधा.कार्य व अवसा. काम/क.१०२ व क.११०(अ) अवपॅ/२०१८ दिनांक ११/१०/२०१८ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ व कलम ११०(अ) अन्वये अवसायक नियुक्तीसाठी विभाग स्तरावर अवसायकाचे पॅनेल तयार करण्यात आले होते. सदर पॅनेलचा कालावधी दिनांक ३१/३/२०२२ अखेर संपुष्टात येत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये सन २०२२ ते २०२५ या कालावधीसाठी अवसायक नियुक्तीकरीता विभागस्तरावर अवसायकाचे पॅनेल तयार करावयाचे आहे.

नियुक्त करावयाच्या पॅनेलवर खालीलप्रमाणे व्यक्तींचा समावेश असेल.

१) न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी
२) पॅक्टीसिंग ॲडव्होकेटस
३) चार्टर्ड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट, कंपनी सेक्रेटरी
४) राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी,
५) सहकार विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१, वर्ग-२ दर्जाचे अधिकारी आणि प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी दर्जाचे कर्मचारी,
६) महसुल विभागातील सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी
७) कंपनी लिक्विडेटर म्हणून कामकाज केलेले अनुभवी व्यक्ती,
८) सहकारी संस्थेचे लेखापरिक्षण केले असल्याचे ०५ वर्षाचे अनुभवी प्रमाणित लेखापरिक्षक

तसेच अशा व्यक्तींची नियुक्ती करताना खालील अर्हता / पात्रता असणे आवश्यक आहे-

१) सदर व्यक्तीवर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नसावेत.
२) शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी असल्यास त्यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा.
३) वयोमर्यादा ७० वर्षापर्यत असावी.

४) शारीरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा.

५) प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस व चार्टर्ड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट, कंपनी सेक्रेटरी यांना सहकारी संस्थेचे कामकाजाचा ०५ वर्षाचे अनुभव असणे आवश्यक आहे.

६) कोणत्याही सहकारी संस्थेचा थकबाकीदार नसावा किंवा कलम ८३ व कलम ८८ च्या चौकशीबाबत जबाबदार नसावा.

७) सदर व्यक्ती कोणत्याही काळया यादी (Black List) मध्ये समाविष्ट नसावी.

अवसायक नामतालिका कालावधी -

सन २०२२ ते २०२५ (१/४/२०२२ ते ३१/३/२०२५)असा तीन वर्षासाठी असेल.

अवसायक नामतालिका पुरवणी यादी —

अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर येणाऱ्या अर्जाचा पात्रतेनुसार पुरवणीयादी साठी विचार करण्यात यावा. ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत प्राप्त झालेले अर्ज पुढील वर्षाच्या पुरवणी यादीसाठी घेण्यात यावेत. पुरवणी यादीचा कालावधी दि. ३१/३/२०२५ असा समजण्यात यावा.

सदरची नामतालिका विभागस्तरावर तयार करण्यात यावी. याबाबत सहनिबंधक यांनी विभागस्तरावर कार्यवाही करावयाची आहे त्यासाठीचे वेळापत्रक पुढील प्रमाणे राहील-

नामतालिका तयार करणेबाबतचे वेळापत्रक -

अ.क्र.	तपशील	दिनांक
१	जाहीरात प्रसिध्द करणे	१/१२/२०२१
२	अर्ज सादर करणेची अंतिम मुदत	१/१२/२०२१ ते १४/१/२०२२
३	अर्जाची छाननी	१७/०१/२०२२ ते ३१/१/२०२२
४	प्रारुप नामतालिका प्रसिध्द करणे	१४/०२/२०२२
५	त्यावर हरकती मागविणे	१४/०२/२०२२ ते २८/०२/२०२२
६	हरकतीवर निर्णय करणे	१४/३/२०२२
७	अंतिम नामतालिका प्रसिध्द करणे	२१/०३/२०२२

विभागीय सहनिबंधक यांनी आपल्या विभागाच्या नामतालिकेची सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत सहकार आयुक्त कार्यालयास सादर करावी.

सोबत :- जाहीर निवेदन

(अनिल कवडे)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

जाहीर निवेदन

विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, ---------- यांचे कडून कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये जिल्ह्यातील अवसायनातील संस्थांचे कामकाजासाठी अवसायकांची नामतालिका (पॅनेल) तयार करण्यासाठी खालील व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी
२) प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस
३) चार्टर्ड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट, कंपनी सेक्रेटरी
४) राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी,
५) सहकार विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१, वर्ग-२ दर्जाचे अधिकारी आणि प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी दर्जाचे कर्मचारी,
६) महसुल विभागातील सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी
७) कंपनी लिक्विडेटर म्हणून कामकाज केलेले अनुभवी व्यक्ती,
८) सहकारी संस्थेचे लेखापरिक्षण केले असल्याचे ०५ वर्षाचे अनुभवी प्रमाणित लेखापरिक्षक

अर्जदार व्यक्तींनी खालील प्रमाणे अर्हता धारण केलेली असावी -

१) सदर व्यक्तीवर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नसावेत.
२) शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी असल्यास त्यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा.
३) वयोमर्यादा ७० वर्षापर्यत असावी.
४) शाररीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा.
५) प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस व चार्टर्ड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट, कंपनी सेक्रेटरी यांना सहकारी संस्थेचे कामकाजाचा ०५ वर्षाचे अनुभव असणे आवश्यक आहे.
६) कोणत्याही सहकारी संस्थेचा थकबाकीदार नसावा किंवा कलम ८३ व कलम ८८ च्या चौकशीबाबत जबाबदार नसावा. (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांतर्गत अपात्र नसावा.)
७) सदर व्यक्ती कोणत्याही काळया यादी (Black List) मध्ये समाविष्ट केलेला नसावा.
८) सदर व्यक्ती संबंधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या जिल्ह्यातील रहिवासी असावी.
९) सदर व्यक्ती एकाचवेळी एकाच जिल्ह्यातून अर्ज दाखल करु शकेल.

अर्जाचे विहीत नमुने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था ---------- विभाग-----पत्ता---------- ---------- यांचे कार्यालयात १/१२/२०२१ ते १४/१/२०२२ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील. अर्ज सादर करणेची अंतिम मुदत दिनांक १४/१/२०२२ पर्यत राहील. प्राप्त अर्जाची छाननी दिनांक ३१/०१/२०२२ रोजी पूर्ण करुन, दिनांक १४/०२/२०२२ पर्यत प्रारुप नामतालिका प्रसिध्द करणे व दिनांक २८/०२/२०२२ हरकती मागवणे व दि. १४/३/२०२२ रोजी हरकतींचा निर्णय करुन दिनांक २१/०३/२०२२ रोजी अंतिम नामतालिका प्रसिध्द करण्यात येईल. याबाबतची जाहीर सूचना या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था---------

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये अवसायन कामकाजासाठी अवसायकांच्या नामतालिकेवर नेमणूक होण्यासाठीचा अर्ज.

प्रति,

विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था---------

विषय : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये अवसायन कामकाजासाठी अवसायकांचे नामतालिकेवर (पॅनेल) वर नेमणूक होणेबाबत.

संदर्भ :- दै.---------- मधील दिनांक ---------- रोजीची जाहिरात.

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये अवसायन कामकाजासाठी अवसायकांचे नामतालिकेवर माझी नेमणूक होण्याकरीता माझी वैयक्तीक माहिती खालीलप्रमाणे :-

१. अर्जदाराचे नाव :- ----------

(आडनाव) (नाव) (वडीलांचे / पतीचे नाव)

२. कायम पत्ता :- ----------

संपर्कासाठी पत्ता ----------

(कायम पत्त्यापेक्षा वेगळा असेल तर) :- ----------

३. जन्म तारीख :- ----------

४. शैक्षणिक पात्रता :- ----------

५. दूरध्वनी क्रमांक :---------- ६. भ्रमणध्वनी क्रमांक :----------

७. ई मेल आयडी :- ----------

८. आधार कार्ड क्रमांक :- ----------

९. पॅनकार्ड क्रमांक :- ----------

१०. अर्जदार हा :-

अ) सेवानिवृत्त अधिकारी असल्यास :- (न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी, सहकार विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१, वर्ग-२ दर्जाचे अधिकारी आणि सहकार अधिकारी, प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी, महसुल विभागातील सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी, राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी असल्यास)

i) नियम वयोमानान्वये सेवानिवृत्तीचा दिनांक :- ----------

ii) निवृत्ती वेळी धारण केलेले पद व कार्यालय :- ----------

iii) सेवानिवृत्ती आदेश जावक क्र. व दिनांक :- ----------

ब) प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस् असल्यास :-

i) शैक्षणिक अर्हता :- ----------

ii) (सनद) बार कौन्सील येथे नोंदणीचा क्रमांक व दि. :----------

क) कंपनी लिक्वीडेटर असल्यास :-

i) कंपनीचे नाव :- ----------

ii) लिक्वीडेटर म्हणून कामकाज करीत असल्यास दिनांक -------- व कालावधी------- वर्षे---

iii) कंपनी लिक्वीडेटर म्हणून नियुक्तीच्या आदेशाचा सक्षम प्राधिकाऱ्याकडील क्रमांक व दिनांक.----------

ड) प्रमाणित लेखापरिक्षक असल्यास :-

i) नामिकेवरील अनुक्रमांक :- ----------

ii) मागील ५ वर्षातील लेखापरिक्षण केलेल्या संस्थांचे प्रमाणपत्र ----------

११) सहकारी संस्थेच्या कामकाजाचा अनुभव :-

अ.क्र.	संस्थेचे नांव	कामकाजाचे स्वरुप	अनुभवाचा कालावधी (वर्षे)

१२) अवसायक/प्रशासक कामकाजाचा अनुभव

अ.क्र.	कलम १०२ / कलम ११० (अे) अन्वये आदेश	अवसायक/प्रशासक म्हणून कामकाज केलेल्या संस्थेचे नांव व पत्ता	कालावधी

१३) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-

i) शैक्षणिक अर्हता : पदवी प्रमाणपत्र/व्यवसायीक अभ्यासक्रम प्रमाणपत्र

ii) जन्म दिनांक प्रमाणपत्र

iii) आधार कार्ड

iv) पॅन कार्ड

v) रहिवासाचा पुरावा (टेलिफान बील/लाईट बील/प्रॉपर्टी टॅक्स/मतदान कार्ड इं.)

vi) सेवानिवृत्तीचा आदेश

vii) सनद (बार कौन्सील) चाटर्ड अकौन्टंट, कॉस्ट अकौंन्टंट यांचे सक्षम प्राधिका-याकडील नोंदणीचे प्रमाणपत्र/कंपनी लिक्वीडेटर/प्रमाणित लेखापरिक्षक यांची नामतालिकेची प्रत)

viii) अनुभवाचे पृष्ठयर्थ :- नियुक्तीचे आदेश

ix) सर्व माहिती व विवरण सत्य व अचूक असल्याचे प्रतिज्ञापत्र

स्वयंघोषीत प्रतिज्ञापत्र

मी----------,न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीश/सेवानिवृत्त विधी अधिकारी/ सहकार विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१,वर्ग-२ दर्जाचे अधिकारी / सहकार अधिकारी प्रथम श्रेणी/द्वितीय श्रेणी दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी/महसुल विभागातील सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी/राष्ट्रीयकृत बँका/भूविकास बँका/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका/व्यापारी बँका/नागरी सहकारी बँका/राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेल सेवानिवृत्त अधिकारी वय ---------- राहणार ---------- प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, मी ---------- परिक्षा ---------- या दिनांकास उत्तिर्ण असून आत्तापर्यंत मला ---- वर्षाचा सहकारी संस्थांच्या कामाचा अनुभव आहे.

अवसायक नामतालिकेसाठी करावयाच्या अर्जासोबतचे प्रतिज्ञापत्र नमूना

अ.क्र.	वर्ष	संस्थेचे नाव	लेखापरिक्षणाचा प्रकार (वार्षिक, चाचणी, फेरलेखापरिक्षण, परिव्यय व मुल्य (performance)

१. माझ्यावर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नाहीत.

२. मी शासकीय सेवानिवृत्त अधिकारी असून माझी कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नाही तसेच सेवेत माझ्यावर कोणताही ठपका ठेवलेला नाही. (लागू असल्यास)

३. माझे वय ७० वर्षाच्या आत आहे.

४. मी शाररीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम आहे.

५. प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस् व चार्टर्ड अकौंटंट, कॉस्ट अकौंटंट, कंपनी सेक्रेटरी यापैकी मी------असून मला सहकारी संस्थेच्या कामकाजाचा ०५ वर्षाचा अनुभव आहे.

६. मी कोणत्याही सहकारी संस्थेचा थकबाकीदार नाही किंवा कलम ८३ व ८८ च्या कार्यवाहीमध्ये मला जबाबदार धरलेले नाही. (मी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांतर्गत पात्र आहे.)

७. माझी सहकार खात्याने / इतर कोणत्याही प्राधिकरणाने काळया यादीमध्ये (Black List) समावेश केलेला नाही.

८. मी संबंधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या ---------- या जिल्हयातील रहिवासी आहे.

९. मी ज्या संस्थेचे अवसायक म्हणून काम करेल, त्या संस्थेशी माझे हितसंबंध नाहीत.

वरील अवसायक नामतालिकेसाठी स्वयंघोषीत प्रतिज्ञापत्रातील १ ते ९ मुद्दे हे सत्य असून त्यामध्ये काही खोटे आढळल्यास होणाऱ्या परिणामास व कारवाईस मी (खाली सही करणार) पात्र राहील.

स्थळ :-
दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी----------
नाव :

(अर्जासोबत अर्हतेमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती जोडण्यात याव्यात.)